भूमि अभिलेख विभागातील विविध कार्यालयांसाठी बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध शिपाई यांच्या वेतनाकरीता निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: लेखा ०५२६/प्र.क्र.१८५/आस्था-६
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक २९ जुलै, २०२६

<u>संदर्भ</u> : महसूल व वन विभाग, शासन ज्ञापन क्र. पदनि-०२२६/प्र.क्र.७०/आस्था-६, दि.१६.०४.२०२६.

<u>प्रस्तावना:-</u>

भूमि अभिलेख विभागातील बहुतांश कार्यालयात शिपायांची सर्व पदे रिक्त असल्यामुळे अशा कार्यालयांमध्ये अभिलेखांमध्ये अभिलेख व्यवस्थित ठेवणे, कार्यालय उघडणे, बंद करणे, साफसफाई करणे, इत्यादी कामे गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांनाच करावी लागत आहेत. तसेच मोजणी व परिरक्षणाच्या कामाकरीता भूकरमापक व परिरक्षण भूमापक यांना जबाबदार मदतनीस नसल्यामुळे त्यांना दिलेले उद्दीष्ठ साध्य करणे अडचणीचे होत आहे. त्यामुळे विभागातील मंजुर आकृतीबंधानुसार नवनिर्मित कार्यालयांकरीता अशी एकूण ७०० शिपाई संवर्गातील पदे बाह्य यंत्रणेमार्फत उपलब्ध करून घेण्यास तसेच त्यांच्या सेवा माहे एप्रिल २०२६ ते मार्च २०२९ अखेर मे. बीव्हीजी इंडिया लिमिटेड यांचेकडून उपलब्ध करून घेण्यास व त्यासाठीचे खर्चास संदभार्त नमूद शासन ज्ञापनाव्दारे मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बाह्यस्त्रोताव्दारे उपलब्ध ७०० शिपायांपैकी ६८७ शिपाई यांचे वेतनाकरीता निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

भूमि अभिलेख विभागातील मंजूर शिपाई पदांपैकी रिक्त असलेले तसेच मंजुर आकृतीबंधानुसार नवनिर्मित कार्यालयांकरीता बाह्यस्त्रोताव्दारे मे. बीव्हीजी इंडिया लिमिटेड यांचेकडून सेवा पुरवठा केलेल्या ७०० शिपायांपैकी ६८७ शिपाई यांच्या वेतनासाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात माहे जुन/जुलै,२०२६ च्या अधिवेशनात "मागणी क्र.१ सी.२०२९ जमीन महसूल, १०३ (००) (०२) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांची आस्थापना (२०२९०४२२) (१०)-कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षातर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेला निधीपैकी ५० टक्केच्या मर्यादेत रु.१०,६०,५१,०००/- अक्षरी रु.दहा कोटी साठ लक्ष एक्कावन्न हजार मात्र इतका निधी वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी आहरीत करण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सादर निधी मंजूरी दिलेल्या प्रयोजना व्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी खर्च होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रस्तुत निधी खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ सादर शासनास सादर करावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौ.सं.क्र.५६९/२०२६/व्यय-१०, दि.१८.०७.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेस अनुसरुन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येता आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२९१५२९५२९०४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=F0B627B3230194FA84BD0E5B4EB590E81C2C15CE998BA19F4825B4AC3EEE13CE, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1E31BE6F920A3D606925AB728A537257F35F1F0BE19B929C1B0DDCBA1E89366B, cn=ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2026.07.29 15:30:48 +05'30'

(अश्विनी यमगर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रलय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
८. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
९. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य,पुणे
१०. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती (आस्था-६).